आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र -संध्याकाळी ७.००वाजता

२३ डिसेंबर २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

1. युवकांना रोजगार देताना संपूर्ण पारदर्शकता अवलंबिली जात असून रोजगार मिळालेल्या युवकांनी समर्पण आणि सत्यनिष्ठेनं देशसेवा करावी, असं प्रधानमंत्र्यांचं आवाहन

2. शाश्वत विकासासाठी नैसर्गिक शेती ही काळाची गरज असल्याचं केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांचं प्रतिपादन

3. नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळावरील नवीन धावपट्टीच्या कामात होत असलेल्या विलंबाबद्दल केंद्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केली तीव्र नाराजी

**आणि**

**4.** पाकिस्तान क्रिकेट मंडळाने आयसीसी चॅंपियन्स करंडक २०२५ च्या भारताच्या सामन्यांसाठी, तटस्थ स्थळ म्हणून संयुक्त अरब अमिरात या देशाची केली निवड

**<><><><><>**

गेल्या दीड वर्षांत सुमारे १० लाख युवकांना सरकारी नोकरी मिळाल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सांगितलं. देशभरात आज ४५ ठिकाणी रोजगार मेळावे घेण्यात आले त्या माध्यमातून ७१ हजारांहून अधिक युवकांना नियुक्तीपत्राचं वाटप केलं. गृह मंत्रालय, टपाल कार्यालय, उच्च शिक्षण विभाग, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, वित्तीय सेवा विभाग यांसारख्या विविध ठिकाणी रोजगार देण्यात आले आहेत.

या मेळाव्यांत उपस्थित असलेल्या युवकांशी प्रधानमंत्री मोदी यांनी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून संवाद साधला. युवकांना रोजगार देताना संपूर्ण

पारदर्शकपणे दिले जात असून रोजगार मिळालेल्या युवकांनी समर्पण आणि सत्यनिष्ठेनं काम करत देशसेवा करावी, असं आवाहन प्रधानमंत्र्यांनी केलं.

भारताला २०४७ पर्यंत विकसीत राष्ट्र बनवायचे आहे. यासाठी देशहिताचे निर्णय आणि योजना आखताना युवकांना केंद्रस्थानी ठेवल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. देशाचा विकास हा तिथल्या युवकांची मेहनत, क्षमता आणि नेतृत्वावर अवलंबून असल्याचं प्रधानमंत्री मोदी यांनी सांगितलं. रोजगार मेळाव्यात ५० हजारांहून अधिक नियुक्त्या अर्ध सैनिक दलात झाल्याची माहिती कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाचे राज्यमंत्री डॉक्टर जितेंद्र सिंह यांनी दिली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत नाताळ उत्सवात सहभागी होणार आहेत. भारतीय कॅथोलिक बिशप्स परिषदेतर्फे या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. यावेळी ख्रिस्ती समाजाचे प्रमुख नेते, चर्चचे कार्डिनल्स आणि बिशप्स यांच्याशी प्रधानमंत्री चर्चा करतील. कॅथोलिक चर्चच्या मुख्यालयातील प्रधानमंत्र्यांचा हा पहिलाच कार्यक्रम आहे.

**<><><><><>**

पुण्याच्या गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स आणि इकानॉमिक्स संस्थेच्या अमृत महोत्सव परिषदेत केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान सहभागी झाले होते. आजच्या राष्ट्रीय शेतकरी दिवसाचं औचित्य साधून, कृषी संबंधित विद्यापीठांमध्ये होणारे संशोधन आणि नविनीकरणाचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणं आवश्यक असून आमचं सरकार त्यासाठी सर्वोतपरी प्रयत्न करत आहे. अद्यायावत तंत्रज्ञानाच्या मदतीनं शेतकऱ्यांना मुख्य प्रवाहत आणले जाईल, असं चौहान यांनी यावेळी सांगितलं. प्रयोगशाळेत होणारे यशस्वी प्रयोग शेतकऱ्यांपर्यंत पोहोचायला

हवेत, त्यांचे लाभ शेतकऱ्यांना घेता यायला हवेत, असंही शिवराजसिंह चौहान यांनी सांगितलं.

**बाईट होल्ड- केंद्रीय मंत्री शिवराज सिंग चौहान**

**याविषयी अधिक माहिती देत आहेत आमचे प्रतिनिधी**

***होल्ड व्हाईस कास्ट...***

शेतीमध्ये वाढत्या उत्पादनाबरोबरच मानवी आरोग्य आणि मातीच्या आरोग्याची सुरक्षितता देखील महत्त्वाची आहे. त्यामुळे विषमुक्त आणि शाश्वत विकासासाठी नैसर्गिक शेती करणं ही काळाची गरज असल्याचं केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज पुण्यात केलं.

कृषी तंत्रज्ञान अनुप्रयोग संशोधन संस्था म्हणजे अटारी पुणेच्या वतीनं आयोजित किसान सन्मान दिवस २०२४ शेतकरी आणि ग्रामीण विकास लाभार्थी संमेलनात ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थित होते.

राज्यातील नैसर्गिक शेतीचे क्षेत्र २०२५ पर्यंत २५ लाख हेक्टरपर्यंत नेण्यात येईल. त्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेती अधिक समृद्ध करण्याची गरज आहे, असंही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

**<><><><><>**

परभणीमध्ये सोमनाथ सुर्यवंशी यांचा मृत्यू पोलीस कोठडीतल्या मारहाणीमुळे झाला असून या हत्येला जबाबदार असणाऱ्या पोलिसांना कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली आहे. परभणीमध्ये सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटुंबियांची राहुल गांधी यांनी आज भेट घेतली. त्यावेळी ते वार्ताहरांशी बोलत होते. मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणी विधानसभेत खोटी माहिती

दिल्याचे सांगत तेही याप्रकरणी तितकेच जबाबदार आहेत, असंही राहुल गांधी या वेळी म्हणाले.

**<><><><><>**

नागपूरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावरील नवीन धावपट्टीच्या कामात होत असलेल्या विलंबाबद्दल केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. हे काम एका महिन्याच्या आत पूर्ण न केल्यास कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी कंत्राटदार कंपनीला दिला आहे.

नव्या धावपट्टीच्या कामाची निविदा गेल्या वर्षी डिसेंबर मध्ये प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानंतर यावर्षी १ मे रोजी के. जी. गुप्ता कंपनीला या कामाचे कार्यादेश देण्यात आले. अद्याप हे काम पूर्ण न झाल्याच्या तक्रारी त्यांच्याकडे आल्या होत्या, त्यावर त्यांनी हे आदेश दिले आहेत. हे काम २१ मे २०२५ पर्यंत पूर्ण होईल, असे कंपनीतर्फे सांगण्यात आले आहे.

**<><><><><>**

शासन पुरस्कृत योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना बँकांनी प्राधान्याने कर्ज उपलब्ध करून द्यावं, अशा सूचना यवतमाळचे जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी दिल्या आहेत. महसूल भवन इथं जिल्हाधिकाऱ्यांनी बँकर्स समितीच्या आढावा बैठकीत अनुदान तत्वावर राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या कर्ज वाटपाचा जिल्हाधिकाऱ्यांनी बॅंक निहाय आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. ज्या बँकांचं वाटप कमी आहे, त्यांना वाटप वाढविण्याचे निर्देश त्यांनी दिले. जिल्ह्यात आतापर्यंत झालेल्या पिक कर्ज वाटपाची स्थिती त्यांनी जाणून घेतली. बॅंकांनी जानेवारी अखेरपर्यंत कर्ज वाटपाचे शंभर टक्के उद्दिष्ठ पुर्ण करावे, असं त्यांनी सांगितलं. तसंच टिपेश्वर अभयारण्यात पर्यटन सफारीसाठी बेरोजगार युवकांना

कर्ज, टिपेश्वर जवळच्या अंधारवाडी गावात होम स्टे सुविधा उपलब्ध करण्यासाठीचा कर्ज प्रस्ताव तपासून तातडीने मंजूर करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

**<><><><><>**

क्षयरोगाचे लवकर निदान करुन त्यावर तात्काळ उपचार उपलब्ध करण्याच्या दृष्टीने हिंगोली जिल्ह्यात आजपासून ३ जानेवारी २०२५ पर्यंत सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहिम राबवण्यात येणार आहे.

हिंगोली जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉक्टर देवेंद्र जायभाये यांनी आकाशवाणीला दिलेली प्रतिक्रिया. ...

**होल्ड.. बाईट ..देवेंद्र जायभाये**

**<><><><><>**

पाकिस्तान क्रिकेट मंडळानं २०२५च्या आयसीसी चँपियन्स करंडक स्पर्धेतील भारताच्या सामन्यांसाठी,तटस्थ स्थळ म्हणून संयुक्त अरब अमिरात या देशाची निवड केली आहे. सुरक्षाविषयक कारणांमुळे भारतानं पाकिस्तानमध्ये खेळण्यास नकार दिल्यामुळे पाकिस्ताननं हा निर्णय जाहीर केला आहे. त्यामुळे भारताचे सर्व सामने आता संयुक्त अरब अमिरातीमध्ये खेळले जाणार आहेत. त्या देशात कोणत्या ठिकाणी हे सामने होणार हे पाकिस्तान क्रिकेट मंडळानं स्पष्ट केलं नसलं, तरी दुबईमध्ये हे सामने होतील, अशी शक्यता आहे. पाकिस्तान क्रिकेट मंडळाच्या या निर्णयामुळे आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद म्हणजे आयसीसीसाठी स्पर्धेचं वेळापत्रक निश्चित करण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे.

**<><><><><>**

आयुर्वेदिक औषधांच्या नावाखाली भांगेच्या गोळ्यांची तस्करी करणाऱ्या जितेंद्र कामताप्रसाद जैस्वाल याला राज्य उत्पादन शुल्क विभागाने भाईंदरमधून

अटक केली आहे. त्याच्याकडून दोन लाखांहून अधिक रुपयांच्या भांगेच्या गोळ्यांचा साठा जप्त करण्यात आला आहे. हा साठा उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश राज्यातून रेल्वेने ठाणे, पालघरमधल्या  पान टपऱ्यांवर विक्रीसाठी आणल्याचा राज्य उत्पादन शुल्क विभागाचा अंदाज आहे.

//<><><><><>//